# महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय

**अत्यंत तातडीचे**

क्रमांक : २३६८ /ग-१
महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय,
विधान भवन, नागपूर
दिनांक : डिसेंबर, २०२४

:: परिपत्रक ::

महाराष्ट्र विधानमंडळाचे सन २०२४ चे हिवाळी अधिवेशन सोमवार, दिनांक १६ डिसेंबर, २०२४ पासून विधान भवन, नागपूर येथे सुरु होत आहे. या सत्रासाठी मान्यवरांसाठी उच्च दर्जाची कडेकोट सुरक्षा व्यवस्था करण्याचा निर्णय घेण्यात आलेला आहे. **त्या अनुषंगाने विधीमंडळाच्या आगामी नागपूर येथील हिवाळी अधिवेशनात पुढीलप्रमाणे अद्ययावत सुरक्षा व्यवस्था विषयक कार्यपध्दती ठरविण्यात आली आहे.**

(१) **अधिवेशन कालावधीत कोणत्याही वाहनास विधान भवनाच्या मुख्य व इतर प्रवेशद्वारातुन प्रवेश दिला जाणार नाही.**

(२) मा.अध्यक्ष, महाराष्ट्र विधानसभा, मा.उपसभापती, महाराष्ट्र विधानपरिषद, मा.मुख्यमंत्री, मा.उप मुख्यमंत्री, मा.विरोधी पक्षनेते, महाराष्ट्र विधानपरिषद, मा.मंत्री महोदय, मा.मुख्य प्रतोद, मा.प्रतोद, मा.समिती प्रमुख, मा.विधानमंडळ सदस्य, शासनाचे मुख्य सचिव, विधीमंडळाचे सचिव-१ (कार्यभार), सचिव-२ (कार्यभार), शासनाच्या विभागाचे अतिरिक्त मुख्य सचिव, प्रधान सचिव, सचिव, या सचिवालयाचे अधिकारी, विविध वृत्तपत्रांचे संपादक, वार्ताहर प्रतिनिधी, दुरचित्रवाहिन्यांचे प्रतिनिधी यांच्या वाहनांसाठी वाहनतळ व्यवस्था व प्रवेशपत्रिका (Parking Pass) या परिपत्रकाच्या अ.क्र. १८ मध्ये दर्शविल्याप्रमाणे निश्चित केलेल्या असून सदर प्रवेशपत्रिका 'ग-१' कक्षाकडून घेऊन त्या वाहनांवर स्पष्ट दिसतील अशा लावण्यात याव्यात. **सदर प्रवेशपत्रिका असलेल्या वाहनांनाच सुरक्षा विभागाकडून तपासणी केल्यानंतर विधान भवन प्रवेशद्वारापर्यंत प्रवेश दिला जाईल.** सर्व मान्यवरांना प्रत्येकी फक्त एकच प्रवेशपत्रिका देण्यात येईल.

(३) अधिवेशन कालावधीत मा.मंत्रीमहोदयांचे खाजगी सचिव, विशेष कार्य अधिकारी, स्वीय सहायक व शिपाई यांना तसेच मा.सदस्यांच्या एका अधिकृत स्वीय सहायकास विधान भवनामध्ये फोटो ओळखपत्राच्या अधीन राहून प्रवेश देण्यात येईल.

(४) मा.मंत्रीमहोदयांच्या / मा.सदस्यांच्या अंगरक्षकांना विधान भवनात प्रवेश करता येणार नाही.

(५) अधिवेशन काळात मा.मंत्रीमहोदयांना भेटण्यासाठी येणाऱ्या शिष्टमंडळांना कोणत्याही परिस्थितीत विधान भवनामध्ये प्रवेश देण्यात येणार नाही.

.. २/-

(६) मा.मंत्री महोदयांनी अधिवेशन काळात विभागीय अधिकाऱ्यांना त्यांच्याकडून माहिती अवगत करुन घेण्यासाठी (ब्रिफिंगसाठी) विधान भवनातील त्यांच्या दालनात न बोलविता त्यांच्या निवासस्थानी बोलवावे.

(७) विधान भवन इमारतीमध्ये होणाऱ्या वाढत्या गर्दीमुळे प्राथमिक सुविधांवर पडणारा ताण कमी व्हावा तसेच, सुरक्षा व्यवस्थेची अंमलबजावणी काटेकोरपणे होण्यासाठी मंत्रालयीन विभागांच्या अगदी आवश्यक तेवढयाच अधिकारी/कर्मचाऱ्यांना विधान भवन प्रवेशपत्रिका देण्यात येतील.

(८) मंत्रालयीन सचिवांसाठी व अधिकारी यांचेसाठी असलेल्या गॅलरीमध्ये आवश्यक त्या प्रवेशपत्रिकेशिवाय कोणीही गॅलरीमध्ये प्रवेश करू नये.

(९) स्वत:चे ओळखपत्र तसेच विधानमंडळ सचिवालयाने दिलेली अधिकृत प्रवेशपत्रिका दाखविल्यानंतरच विधान भवनात प्रवेश मिळेल.

(१०) वृत्तपत्रांच्या प्रतिनिधींना माहिती व जनसंपर्क महासंचालनालयाने दिलेले अधिस्विकृतीधारक ओळखपत्र किंवा त्यांच्या वृत्तसंस्थेने दिलेले ओळखपत्र व या सचिवालयाने दिलेल्या प्रवेशपत्रिकेवरच विधान भवनात प्रवेश मिळेल.

(११) खाजगी दूरचित्रवाहिन्यांच्या प्रतिनिधींना त्यांच्या दूरचित्रवाहिन्यांनी दिलेले ओळखपत्र व या सचिवालयाने दिलेल्या प्रवेशपत्रिकेवरच विधान भवनात प्रवेश मिळेल.

(१२) खाजगी दूरचित्रवाहिन्यांच्या प्रतिनिधींची विधान भवन आवारात नेमून दिलेल्या ठिकाणी व्यवस्था करण्यात आली असून त्यांनी त्या जागेवरुनच चित्रीकरण करावे.

(१३) मा.सदस्यांनी त्यांना विधानमंडळ सदस्य म्हणून दिलेला बॅज सहजरित्या दिसेल अशा ठिकाणी लावावा.

(१४) विधान भवन इमारतीमध्ये प्रवेश करतेवेळी सुरक्षा विभागाकडून केली जाणारी सुरक्षा तपासणी ही आपल्या सर्वांच्या सुरक्षिततेसाठी असल्याने या संदर्भात सर्व संबंधितांनी कृपया सहकार्य द्यावे.

(१५) **अधिवेशन कालावधीत विधान भवन, नागपूर इमारत परिसरात भ्रमणध्वनीद्वारे (मोबाईल) छायाचित्र काढणे किंवा छायाचित्रण करण्यास मनाई आहे.**

(१६) विधान भवन परिसराबाहेरील वाहनतळावर वाहने उभी करण्यासंदर्भातील पार्किंग पास क्रमांक वाहतूक शाखा, नागपूर यांचेकडून उपलब्ध करुन घ्यावेत.

.. 3/-

(१७) विधान भवन, **परिसरात प्रवेश करताना प्रत्येकाने** त्यांचे **ओळखपत्र/ प्रवेशपत्र सहजगत्या** दिसेल **अशा** रितीने **लावणे आवश्यक आहे.**

(१८) विधान भवन परिसराबाहेरील वाहनतळाची व्यवस्था खालीलप्रमाणे करण्यात आली आहे.
(विधान भवन परिसरातून वाहन बोलविण्यासाठी ध्वनिक्षेपण व्यवस्था करण्यात आलेली आहे)

| अ.क्र. | वाहन पास रंग | वाहन पार्कींगचे विवरण | पार्कींग स्थळ |
|---|---|---|---|
| (१) | लाल **(P-1)** | मा.अध्यक्ष, महाराष्ट्र विधानसभा,<br>मा.मुख्यमंत्री,<br>मा.उपमुख्यमंत्री,<br>मा.उपसभापती, महाराष्ट्र विधानपरिषद<br>मा.विरोधी पक्षनेता, महाराष्ट्र विधानपरिषद | विधान भवन समोरील मार्ग<br>(संविधान चौक ते कन्नमवार चौक मार्गावर) |
| (२) | जांभळा **(P-2)** | मा.मंत्री, मा.मुख्य प्रतोद, मा.प्रतोद,मा.समिती प्रमुख मा.मुख्य सचिव,मा.अतिरिक्त मुख्य सचिव, महाराष्ट्र शासन; मा. सचिव-१ (कार्यभार), मा.सचिव-२ (कार्यभार), सह सचिव, विशेष कार्य अधिकारी, विधानमंडळ सचिवालय; मा.पीठासीन अधिकाऱ्यांचे सचिव, मा.मुख्य सुरक्षा अधिकारी, विधानमंडळ सचिवालय; विधानमंडळ अधिकारी | डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांचा पुतळा व मिटानिम दर्गा परिसर |
| (३) | पिवळा **(P-3)** | वृत्तपत्र व दुरचित्रवाहिन्यांचे प्रतिनिधी<br>(ओ.बी.व्हॅन) | संग्रहालय मार्ग व शासकीय मुद्रणालय,<br>फॉरेस्ट आफीस चौक |
| (४) | हिरवा **(P-4)** | मा.विधानमंडळ सदस्य | चर्च मैदान |
| (५) | निळा **(P-5)** | वरिष्ठ शासकीय अधिकाऱ्यांची वाहने | हॉस्टेल मैदान ऑलसेंन्ट चर्च |
| (६) | ऑरेंज **(P-6)** | विधान भवन अधिकाऱ्यांची चारचाकी व दुचाकी वाहने | एलआयसी वसाहत कॉर्टर मैदान परिसर |
| (७) | पोपटी **(P-7)** | इतर प्रवेश धारक व पोलीस वाहन पार्कींग<br>राखीव पार्कींग स्थळ | मॉरिस कॉलेज मैदान<br>संविधान चौक जवळ<br>१) मा.उपसंचालक, शिक्षण विभाग मॉरिस टी पॉईंट<br>२) सेन्ट उर्सुल्ला हायस्कूल |

वरील सुरक्षाविषयक सूचनांचे काटेकोरपणे पालन करण्यासाठी सर्वांनी सहकार्य करावे, असे निदेशानुसार कळविण्यात येत आहे.

( ऋतुराज कुडतरकर )
उप सचिव
महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय

प्रति,

(१) दोन्ही सभागृहांचे सर्व सन्माननीय सदस्य.
(२) मा.अध्यक्ष, महाराष्ट्र विधानसभा यांचे सचिव.
(३) मा.उपसभापती, महाराष्ट्र विधानपरिषद यांचे खाजगी सचिव
(४) मा.विरोधी पक्षनेता, महाराष्ट्र विधानपरिषद यांचे खाजगी सचिव.
(५) मुख्य सचिव, महाराष्ट्र शासन, शिबीर कार्यालय, नागपूर.
(६) मा.मुख्यमंत्री यांचे प्रधान सचिव.
(७) मा.उप मुख्यमंत्री यांचे प्रधान सचिव
(८) पोलीस महासंचालक, महाराष्ट्र राज्य.
(९) विभागीय आयुक्त, नागपूर.
(१०) पोलीस आयुक्त, नागपूर
(११) जिल्हाधिकारी, नागपूर.
(१२) आयुक्त, नागपूर महानगरपालिका, नागपूर.
(१३) मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हापरिषद, नागपूर.
(१४) अध्यक्ष, नागपूर सुधार प्रन्यास, नागपूर.
(१५) मंत्रालयातील विभागांचे सर्व अति.मुख्य सचिव, प्रधान सचिव / सचिव.
(१६) मा.मंत्री यांचे खाजगी सचिव / विशेष कार्य अधिकारी.
(१७) संचालक, माहिती व जनसंपर्क संचालनालय, नागपूर-४४० ००१.
(१८) उप संचालक, आरोग्य महासंचालनालय, माता कचेरी परिसर, श्रद्धानंद पेठ, दीक्षा भूमीजवळ, नागपूर-४४० ००१.
(१९) प्रवर मुख्य वाणिज्य प्रबंधक, मध्य रेल्वे, नागपूर मंडळ, नागपूर.
(२०) वाणिज्य अधिकारी (नवीन जोडणी), भारत संचार निगम लि.,जी.पी.ओ.कंपाऊंड, नागपूर-४४० ००१.
(२१) व्यवस्थापक, शासकीय मुद्रणालय, नागपूर.
(२२) मुख्य सुरक्षा अधिकारी, महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय, विधान भवन, नागपूर.
(२३) महाराष्ट्र विधानमंडळाचे सर्व अधिकारी व कक्ष, विधान भवन, नागपूर.
(२४) महाराष्ट्र विधानमंडळातील सर्व पक्ष कार्यालये, नागपूर.
(२५) मंत्रालयीन विभागाची सर्व शिबिर कार्यालये, नागपूर.
(२६) अध्यक्ष, श्रमिक पत्रकार संघ, नागपूर.